महाराष्ट्र राज्य सेवा गट-ब
जिल्हा हिवताप अधिकारी/हत्तीरोग
अधिकारी/[illegible] या पदांचे
सेवाप्रवेश नियम.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आरटीआर-१०९८/प्र.क्र.१३०/सेवा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक-9 एप्रिल,१९९९.

वाचा :- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक : डीएचएस/डीएमओ/इएमटी/सेट-४/९६, दिनांक १८ जानेवारी,१९९६.

शासन निर्णय :- सोबत जोडलेल्या अधिसूचनेस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-४ अ मध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अनिस शेख )
कार्यासन अधिकारी.

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा,मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे.
सर्व उपसंचालक (मंडळ)
सामान्य प्रशासन विभाग/१२.
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई (५ प्रतींसह)

२. त्यांना विनंती की, सोबतच्या अधिसूचनेस महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रामध्ये प्रसिध्दी देऊन त्याच्या ३० प्रती या विभागास पाठवाव्या.

(2)

## अधिसूचना

सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : १ एप्रिल १९९९

क्रमांक : आरटीआर-१०९४/प्र.क्र.१७०/सेवा-१

भारताचे संविधान

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील आरोग्य सेवा संचालनालयातील सामान्य राज्य सेवा, गट-ब मधील जिल्हा हिवताप अधिकारी किंवा हत्तीरोग अधिकारी किंवा जीवशास्त्रज्ञ या पदांच्या सेवाप्रवेशांचे विनियमन करणारे पुढील नियम आहेत:-

१. या नियमांना, आरोग्य सेवा संचालनालयातील जिल्हा हिवताप अधिकारी किंवा हत्तीरोग अधिकारी किंवा जीवशास्त्रज्ञ सामान्य राज्य सेवा, गट-ब (सेवाप्रवेश) नियम, १९९९ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

क) "पदवी" म्हणजे सांविधिक विद्यापीठाची पदवी.

ख) "संचालनालय" म्हणजे, शासनाच्या आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

ग) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन,

घ) "सार्वजनिक आरोग्य विभाग" म्हणजे शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग.

३. संचालनालयातील जिल्हा हिवताप अधिकारी किंवा हत्तीरोग अधिकारी किंवा जीवशास्त्रज्ञ सामान्य राज्य सेवा, गट-ब या पदांवरील नेमणूक एकतर,

क) ज्यांनी संचालनालयामध्ये अवैद्यकीय आरोग्य अधिकारी हे पद धारण केले आहे, व या पदावरील ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेली आहे अशा व्यक्तींमधून पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन, किंवा

ख) जे उमेदवार,

एक) अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांखेरीज ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त नाही.

दोन) कीटकशास्त्र या एका विषयासह सूक्ष्मजीवशास्त्र किंवा प्राणिशास्त्र यांमधील पदव्युत्तर पदवीधारण केलेले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु ज्या उमेदवारांनी

एक) वरील उप-खंड (दोन) मध्ये नमूद केलेली पदव्युत्तर पदवी द्वितीय श्रेणीत धारण केली असेल किंवा

दोन) रक्त नमुन्यांची तपासणी तसेच राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रमांतर्गत कीटकनाशकांच्या फवारणीचे नियोजन व पर्यवेक्षण करण्याचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करण्यात येणारी नेमणूक ५० : ५० या गुणोत्तरात करण्यात येईल.

५. नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर असेल आणि या परिवीक्षा कालावधीमध्ये तिने क्षेत्रीय प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल व ते तिने समाधानकारकरीत्या पूर्ण केले पाहिजे.

६. पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने या पदावर नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तीने विभागीय परीक्षा, व त्यांचाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी परीक्षा जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

७. पदावर नेमणूक झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)

( मो. नु. खान )

महाराष्ट्र शासनाचे उपसचिव.